# येशूने पुढाऱ्यांची विनम्रपणे सेवा करुन त्यांच्या पुढे आदर्श ठेवला

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, येशूने आपल्या शिष्यांचे पाय धुऊन आमच्यासमोर आदर्श उदाहरण ठेवले आहे. त्याच्याप्रमाणे मुलांनी इतरांची नम्र भावनेने सेवा करावी यासाठी त्यांचे कृपा करुन साहय्य कर''.

मुलांचे वय आणि गरजांनुसार कोणतेही योग्य **कार्यक्रम** निवडा.

येशूने आपल्या शिष्यांना इतरांची सेवा नम्रपणे कशी करायची हे कृतीने दाखवले तो वृत्तांत मोठया मुलाने वा शिक्षकाने **योहाना 13:1-17** मधून वाचावा किंवा सांगावा.

**स्पष्ट करा:**

- येशूने आपल्या स्वत:च्या कृत्यामधून आपल्या शिष्यांना शिकवले.
- येशूने इतरांची सेवा कशी करावी हे दाखवव्यासाठी शिष्यांची सेवा नम्रपणे केली.

**प्रश्न विचारा *( प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिलेले आहे ).***

- येशूने आपल्या शिष्यांवर किती काळ प्रीती केली? *(पाहा योहाना 13:1)*
- येशूला यहूदा आपला लवकरच विश्वासघात करणार आहे हे माहित होते का? *(वचन 11)*
- येशूने एकमेकांची सेवा लीनतेने करा याचे शिक्षण पुढाऱ्यांना कशा प्रकारे दिले? *(वचन 15)*
- आम्ही लीनतेने इतरांची सेवा करतो तेव्हा देव आमच्यासाठी काय करणार आहे? *(वचन 17)*

**नाट्यीकरण करा** येशू इतरांचे पाय धुतो (योहान 13:1-17) मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करुन व्यवस्था करा. शिकवव्याच्या वेळी मुलांकडून चांगली तयारी करुन घ्या. तुम्ही सर्व भूमिका केल्याच पाहिजेत असे नाही. मोठया मुलांनी लहान मुलांकडून तयारी करुन घेझयात मदत करावी.



- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी **येशू**, **पेत्र** आणि **निवेदक** ह्या भमिका कराव्यात येशूच्या हातात रुमाल व पाण्याचे भांडे आहे.
- **लहान मुलोनी यहूदा** आणि **शिष्य** ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक :** योहना 13:1-7 मधून येशू इतरांचे पाय धातो ह्या वृत्तांताचा पहिला भाग वाचून भग म्हणा ''येशू काय म्हणतो ने एका।''

**येशू :** उभे राहा, कमरेला मोठा रुमाल टॉवेल बांधा. मग पेत्रासमोर गुडघे टेकून बसा आणि भांडयातील पाण्याने त्याचे पाय धुवा. म्हणा, ''मी तुम्हां सर्वांवर विपुल प्रीती केली आहे. आता लवकरच मी हे जग सोडून माझ्या पित्याकडे स्वर्गात जाणार आहे.''

**शिष्य :** मोठयाने म्हण, ''नाही! नाही!'' ''तुम्ही आम्हांला सोडून जाऊ शकत नाही!'' ''आमच्यापासून दूर जाऊ नका!''

**येशू :** ''आता मी तुम्हांला एक पाठ शिकवणार आहे. (पेत्राचे पाय धुव्यास सुरुवात करा.)

**शिष्य :** मोठयाने म्हण, ''हे काय एखादया गुलामाप्रमाणे येशूने आमचे पाय का धुवावेत?'' ''तो आमचा गुरु आहे!'' ''तो काही आमचा नोकर सेवक नाही!'' ''त्याने असे करता कामा नये!''

**निवेदक :** पेत्र काय म्हणतो ते ऐका.

**पेत्र :** ''येशू थांबा! तुम्ही माझे पाय का धुता? तुम्ही तर माझे गुरु आहात!''

**येशू :** ''ज्यांच्यावर मी प्रीती करतो त्यांची मी नेहमीच सेवा करतो. मी तुम्हांला शुद्ध-स्वच्छ करणे अगत्याचे आहे''.

**निवेदक :** योहान 13:8-17 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''पेत्र यावर काय म्हणतो ते ऐका''.

**पेत्र :** ''असे आहे तर मग माझे हात आणि डोकेसुद्धा धुवा!''

**येशू :** ''नाही, तुम्हांला आवश्यक आहे ते सर्व मी केले आहे. तरीसुद्धा तुम्ही सर्व शुद्ध नाही. तुमच्यातील एकाचे अंत:करण अशुद्ध आहे, स्वच्छ नाही.''

**शिष्य :** मोठयाने म्हणा, ''तो नेमके काणा विषयी बोलत आहे?'' ''कोणाचे अंत:करण अशुद्ध आहे?''

**निवेदक:** ''यहूदाच्या मनात काय विचार चालले आहेत ते जरा ऐका!''

**यहूदा:** ऐकणान्यांकडे जाऊन म्हणा. ''माझ्या अपेक्षेप्रमाणे येशु काही आमची रोमन राजकीय सत्तेच्या नियंत्रणातून सुटका करीत नाही. आता मी त्याला त्याच्या शत्रूंना विकून टाकतो''. (निधून जा).

**येशू :** ''मी तुमचा शिक्षक आणि प्रभू आहे. तरी एखादया से दासाप्रमाणे मी तुमचे पाय धुतले. तुम्ही एकत्रेकांशी असे बागा. तुम्ही एकमेकांची नम्रपणे सेवा करणे अगत्याचे आहे. भग मी तुम्हांला आशीर्वादित करीन''

**पेत्र :** ''तुम्ही आपल्या उदाहरणाने आम्हांला कित्ता घालून दिला आहे आम्ही तो कधाच विसरणार नाही''.


**निवेदक :** नाटिकेसाठी मदत करणान्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न :** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांना प्रौढांना विचारण्यास सांगा.

**पाठ करा 1 पेत्र 5:5** ''तरुणांनो, वडिलांच्या अधीन राहा. तुम्ही सर्व जण एकमेकांची सेवा करण्यासाठी नम्रतारुपी कमरबंद बांधा, कारण देव गर्विष्ठांना विरोध करितो आणि लीनांवर कृपा करितो''.

**विचारा :** आपल्या नम्रतेने लोकांची सेवा कशा प्रकारे करता येते? (मुलांनी उदाहरणे सांगावती)

**स्पष्ट करा :** येशूचे पाय एका पापी स्त्रीने तिच्या अश्नूंनी धुतले आणि स्वत:च्या केसांनी पुसले, हे करण्यास येशूने तिला मना केले नाही. परंतु हे सर्व एका धार्मिक माणसाच्या घरात घडले, त्याने मात्र झाल्या प्रकारबद्दल येशूला बोल लावले. येशूने उत्तर दिले की ज्याच्या अधिक पातकांची क्षमा झाली आहे तो अधिक प्रीती करणार आणि त्याने तिच्या पातकांची क्षमा केली (लूक 7:37-48).





पावलांचे चित्र काढ़ा. मुलांनी हे चित्र काढून पुढच्या उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवावे. आणि येशूने जसे आपल्या शिष्यांचे पाय धुतले व सेवा केली तशीच आम्हांलाही नर्मभावने एकमेकांची सेवा कश प्रकारे करना येते हे ह्या चित्रावरुन पहायला मिळते हे सांगा.

**म्हणा :** चार मुलांना फितिप्पै. 2:3-8 मधून प्रत्येकी एक वचन म्हणव्यास सांगा:

''तट पाठव्याच्या अथवा पोकळ डौल मिरवव्याच्या बुद्धीने काहीही करु नका, तर लीलतेने एकमेकांना आपणापेक्षा श्रेष्ठ माना.

''तुम्ही कोणीही आपलेच हित पाहू नका. तर दुसन्याचेही पाहा.

''अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ढायीही असो, तो देवाच्या स्वरुपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वत:ला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरुपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले.

''आणि मनुष्य प्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले, येथपर्यन्त आज्ञापालन करुन त्याने स्वत:ला लीन केले''.

**प्रार्थना :** ''प्रिय येशू तू आमचा प्रभू आणि शिक्षक आहेस. तू अत्यंत विनम्रभावाने इतरांची सेवा केलीस म्हणून आम्ही तुझी स्तुती करतो. तुझा आदर्श समोर ठेवून वाटचाल करण्यास आमचे साहाय्य कर. तसेच इतरांची सेवा करण्यासही आमचे साहाय्य कर.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net